वर्ष- १० | अंक- ३४ | मुंबई, मंगळवार, ०९ जुलै ते १५ जुलै २०२४ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

PG 2

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

नऊ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून हत्या

3 → जीवनाशी घेती पैजा...

पंचकर्म म्हणजे काय? ← 4

# उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्य सापडले

## ▮पोलीस भरती प्रक्रिया ▮तिघांविरुद्ध मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा

▮**मीरा रोड** : मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई भरती प्रक्रियेदरम्यान मैदानी चाचणीसाठी आलेल्या तीन उमेदवाराकडे उत्तेजक द्रव्याच्या खाली बाटली, इंजेक्शन आढळून आल्याने तीन उमेदवाराविरुद्ध मीरा रोड पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून त्यानंतर उमेदवारावर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस भरत सुरू झाली आहे. भरतीच्या सुरुवातीलाच पावसाचा अडथळा निर्माण झाल्यामुळे ही भरती प्रकिया भाईंदर येथील मैदानाऐवजी मीरा रोड येथे घेतली जात आहे. यात आयुक्तालयात पोलीस शिपाई रिक्त असलेली २३१ पदे भरली जाणार आहेत. यासाठी ८ हजार ४२३





उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. भरती प्रक्रियेदरम्यान कुठलीही अनुचित घटना घडू नये. तसेच गैरप्रकार होऊ नये म्हणून पोलिसांकडून योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. मीरा रोड येथील मैदानात सुरू असलेल्या मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना बोलावण्यात आले होते. यावेळी प्रत्येक उमेदवार व त्यांच्या सामानाची तपासणी करून उमेदवारांना मैदानी परीक्षेसाठी आत सोडले जात होते.

यादरम्यान तीन उमेदवाराच्या बॅगेत येथे उत्तेजक द्रव्याच्या काही खाली वस्तू आढळून आल्या. संजय भाणुदास कोडळकर (३१, सोलापूर) याने २ मोकळे इंजेक्शन, अरुण प्रकाश वाघमारे (२८, संभाजीनगर) याने मोकळे इंजेक्शन पॅकेट व विकास बाबुलाल गुरे (२४, संभाजीनगर) यांनी मॅफेटरमाइन सल्फेट मोकळे इंजेक्शन, औषधाची मोकळी बाटली जवळ बाळगले असताना दिसले. तिन्ही उमेदवारांनी त्यांच्याकडे असलेल्या इंजेक्शनव्दारे उत्तेजक द्रव्ये औषधे शरीरात घेण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेले असताना मिळून आले, तसेच त्यांनी पोलीस भरतीच्या आवेदन पत्रातील शासनाने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन केले आहे. त्यानुसार तीन उमेदवाराविरुद्ध उत्तेजक द्रव्य बाळगल्याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि रामेश्वर पडवळ हे करत आहेत.

# जमिनीच्या वादातून भिवंडीत रिक्षाचालकाची हत्या

▮**भिवंडी** : जमिनीच्या वादातून दोन भावांनी रिक्षा चालकाला बेदम मारहाण केल्याने त्याचा उपचाारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी दोघा भावांविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. राकेश शंकर वनगुंटी (३९) असे मृताचे नाव आहे. तर राजेश पुंडलीक जामदार व त्याचा भाऊ प्रभुलींग जामदार अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

मृत राकेश हा मूळचा कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यातील असून त्याची पत्नी व दोन मुले मूळगावी आहेत. तर राकेश सद्यस्थितीत शहरातील कोंबड पाड्यातील सांबरे चाळीत राहत असून तो उदरनिर्वाहासाठी रिक्षा चालवतो. दरम्यान राकेशच्या आई सुमित्रा वनगुंटी हिच्या नावावर येथील रामनगरमधील शंकर मंदिराजवळ मोकळी जमीन आहे. त्या जागेत या भावांनी माती व विटांचा कचरा टाकला होता. तो राकेशने २३ जून रोजी आरोपींना काढण्यास सांगितला असता त्या गोष्टीचा राग मनात धरून राजेश प्रभुलिंग या दोघांनी लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. त्यानंतर त्याच्यावर येथील इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार करण्यात



आले. मात्र २९ जून रोजी सायंकाळी त्याची प्रकृती खालावल्याने त्यास शिवाजी चौकातील खाजगी प्राजक्ता हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु तेथेही राकेशच्या प्रकृतीत सुधारणा येत नसल्याने डॉक्टरांनी त्यास अधिक उपचारासाठी कळवा येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्याचे सांगितल्याने राकेशला रुग्णालयात नेत असताना त्याचा वाटेतच मृत्यू झाला आहे. पोलिसांनी त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे.

# येऊर येथील बार, रेस्टॉरंटवर कारवाई

▮**ठाणे** : अनधिकृत पब, हुक्का पार्लर, बार व अंमली पदार्थ विक्री करणारी अवैध बांधकामावर कारवाई करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले होते.त्यानुसार ठाणे महापालिका क्षेत्रात सोमवारी चौथ्या दिवशीही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत झालेल्या या कारवाईत येऊर येथील ७ बार आणि रेस्टॉरंटवर कारवाई करण्यात आली. सुमारे १ लाख ४२ हजार चौरस फूटांच्या क्षेत्रावर ही कारवाई करण्यात आली.

मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार अमली पदार्थ विकणारे, बार, हुक्का पार्लर यांच्यावर महापालिका क्षेत्रात गेले काही दिवस सातत्याने कारवाई सुरू आहे. त्यात , सोमवारी येऊर येथे सात ठिकाणी कारवाई करण्यात आली.त्यांनी पुन्हा बांधकाम केले तर ते पुन्हा तोडले जाईल.तसेच, त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.त्याचबरोबर, तोडकामाचा खर्चही त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल,असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या

## १ लाख ४२ हजार चौरस फूट क्षेत्रावर हातोडा



कारवाईची पाहणी सुरू असताना स्पष्ट केले.लालाला बार, बॉम्बे डक, गारवा, लाईट हाऊस, सिक्रेट्स ऑफ येऊर, सफारी वूडस, माऊंटन स्पिरिट या सात ठिकाणी ठाणे महापालिका आणि पोलिस यांनी संयुक्तपणे कारवाई केली.

त्यासाठी दोन पोकलेन, पाच जेसीबी, पाच कटर, १०० कर्मचारी असा फौजफाटा येऊरमध्ये नेण्यात आला.उपायुक्त (स्थावर) मनीष जोशी, उपायुक्त (अतिक्रमण) जी. जी. गोदेपुरे,उपायुक्त शंकर पाटोळे, उपायुक्त दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक आदी वरिष्ठ अधिकारी या कारवाईच्यावेळी उपस्थित होते. सिक्रेट्स ऑफ येऊर या हॉटेलबद्दल हवाई दलाकडून तक्रार करण्यात आली होती.

■ तर, गारवा या रेस्टॉरंटबद्दल स्थानिक आदिवासींनी केलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान स्थानिक नागरिकांशी आयुक्त राव यांनी संवाद साधला. अनधिकृत पब, हुक्का पार्लर, बार व अंमली पदार्थ विक्री करणारी अवैध बांधकामे तोडून टाकण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार ठाणे महापालिका क्षेत्रात ही कारवाई सुरू आहे. आतापर्यंत, शाळा आणि महविद्यालयापासून १०० मीटरच्या आत असलेल्या एकूण ९८ पानटपऱ्या जप्त तसेच सिल करण्यात आल्या. तसेच, अनधिकृत हुक्का पार्लर, पब, बार अशा मिळून ३४ ठिकाणी पोकलेनच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली. काही ठिकाणी अनधिकृत, वाढीव शेड हटवण्यात आले.

# दोन चोरट्यांना पकडल्याने ७ गुन्हे उघड

## ▮दुचाकी, सायकल, दागिने असा मुद्देमाल जप्त

▮**वसई** : सातीवलीच्या धुरी इंडस्ट्रीयल इस्टेटमधील गाळ्यातून घरफोडी, वाहन चोरी करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांच्याकडून ७ गुन्हे वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने उघडकीस आणले, अशी माहिती पोलीस निरीक्षक अभिजित मडके यांनी दिली. १७ जूनला रात्री ही घटना घडली.

चोरट्याने प्लास्टिक वस्तू बनविण्याच्या ४० हजार रुपये किमतीच्या दोन लोखंडी डाय चोरल्या होत्या. याप्रकरणी कंपनी मालक वेदप्रकाश व्यास (६३) यांनी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. वसई विरार परिसरात घरफोडी, चोरी, वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन वरिष्ठांनी हे गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले होते. वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सचिन




सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सलग १० दिवस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोधमोहीम राबवून आरोपीची माहिती गोळा केली. खानिवडे परिसरात सापळा रचून आरोपी आकाश कदम आणि साजन वळवी यांना ताब्यात घेतले. दोघांची चौकशी केल्यावर त्यांनी वसई पूर्वेतून चोरी केलेल्या ३ दुचाकी, ५ सायकल, सोन्याचे दागिने व रोख रकमेसह इतर असा १ लाख ५१ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# मद्यपींकडून शाळेची बस अडवून चालकाला बेदम मारहाण

## ▮बोईसर रेल्वे फाटक नजीकचा प्रकार ▮पोलिसांनी आरोपींना केली अटक

▮**बोईसर** : बोईसर रेल्वे फाटक क्र. ५२ वंजारवाडा येथील फाटकात सेंट फ्रान्सिस शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसला अडवून चालकाला बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी सायंकाळी ६च्यादरम्यान घडली. यावेळी विद्यार्थी भयभीत झाले होते. या घटनेची माहिती पोलीस निरीक्षकांना दूरध्वनीवर मिळताच त्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवले. त्यांनी आरोपींना अटक केली असून, बसमधील विद्यार्थ्यांना सुखरूप घरी सोडण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. फाटक क्र. ५२ वंजार वाडा येथून सेंट फ्रान्सिस शाळेतील विद्यार्थ्यांना घरी घेऊन जाणारी बस अडवून दारूच्या नशेत असलेल्या दोन व्यक्तींनी चालकाला बेदम मारहाण केली आहे. रेल्वे फाटकात वाहतूक कोंडी झालेली असताना बसचा धक्का लागल्याने संतप्त झालेल्या दुचाकीस्वार रूस्तम संतोष सिंह व अशोक जगदीश सिंह यांनी बसचालक विवेक अरविंद धोडी व वाहक अविनाश नारायण करबट यांना मारहाण केली.



दरम्यान, बसचालक व वाहक दारूच्या नशेत असल्याचे दिसून आले. अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ रेल्वे फाटक रोखून धरण्यासाठी भाग पाडणाऱ्या रूस्तम सिंह व अशोक सिंह यांनी रस्त्यावर जाणाऱ्या महिलांना व लहान मुलांना खाली पडेपर्यंत बसचालकाला मारहाण केल्याचा व्हिडिओ हाती आला असून, गर्दीचा फायदा घेत बसचालकाचा मोबाईल बसमधून लंपास करताना अशोक सिंह याचा व्हिडिओ समोर आला आहे. यावेळी विद्यार्थी भयभीत झाले होते. या घटनेची माहिती पोलीस निरीक्षक शिरीश पवार यांना दूरध्वनीवर दिली. त्यांनी तात्काळ पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठवून विद्यार्थ्यांसहित बसची सुटका केली. विद्यार्थ्यांना घरपोच केल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.



# तिसऱ्या दिवशीही तोडक कारवाई सुरूच

▮**मीरा रोड** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार मीरा-भाईंदर महापालिका प्रभाग समिती क्र. ६ मधील रेस्टॉरंट बार आणि लॉजच्या बेकायदा बांधकामावर शनिवारी आयुक्त संजय काटकर यांच्या उपस्थितीत पोकलेन व मनुष्यबळाच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली.

आयुक्तांनी विविध प्रभागांतील बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रभागातील बेकायदा हॉटेल/बार, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, बेकायदा होर्डिंग्ज, बेकायदा झोपड्यांवर कारवाई करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शनिवारी प्रभाग समिती क्र. ६ मधील एम.पी. पॅलेस लॉज व मीरा गावठाणमधील केम छो बारच्या बेकायदा बांधकामावर तोडक कारवाई करण्यात




आली. ही कारवाई आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त (अतिक्रमण) रवि पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आली. शहरात अनेक बेकायदा बांधकामे आहेत. या बांधकामाला तत्कालीन प्रभाग अधिकारी यांनी नियमबाह्य दुरुस्ती परवानगी दिली आहे. तसेच अनेक बेकायदा बांधकामांना नियमित केले आहे. हे प्रभाग अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश आयुक्तांनी रद्द केले आहेत. त्यामुळे या बेकायदा बांधकामावर कारवाई केली जाणार, की त्यांना अभय मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# प्लॅटफॉर्म व ट्रेनच्या गॅपमध्ये पडून दोन प्रवाशांचा मृत्यू

▮**कल्याण**: रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली असून त्यामुळे रेल्वे रुळावर तसेच प्लॅटफॉर्मवर अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे. कल्याण रेल्वे स्टेशनवर फलाट आणि ट्रेनमधील गॅपमध्ये पडून दोन प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. लालनदेवी राजेश शर्मा (५४) आणि देवाशिष दीपक मिश्रा (३२) असे या मृत प्रवाशाचे नाव आहे. दौंड - इंदूर सुपरफास्ट एक्स्प्रेस पकडण्यासाठी हे प्रवासी कल्याण रेल्वे स्टेशनला आले होते. ट्रेन प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वर उभी होती. धावत्या ट्रेनमध्ये चढताना दोन्ही प्रवाशांचे पाय घसरले आणि ते प्लॅटफॉर्म आणि ट्रेनमधील गॅपमध्ये पडल्याने ट्रेनला धडकले.

# मद्यपी पर्यटकांवर पोलिसांची नजर

▮**नवी मुंबई** : घणसोलीमधील गवळीदेव धबधबा, सुलाई देवी व इलठण पाडा येथील ब्रिटिशकालीन धरण येथे पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी होण्यास सुरुवात होऊ लागली आहे. मात्र मद्यपी व अतिउत्साही पर्यटकांना आळा घालण्यासाठी स्थानिक पोलिसांनीही विशेष खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे.

गवळीदेव येथील धबधब्यावर जाणाऱ्या पर्यटकांना सावध करण्यासाठी रबाळे एमआयडीसीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी मार्गदर्शक सूचना फलक लावण्यात येणार असल्याचे सांगितले. वाहतूक कोंडीची समस्या उद्भवू नये, यासाठी पर्यटकांनी व्यवस्थित वाहने पार्क करावीत. धबधब्याच्या ठिकाणी खूप उंचीवरून पाणी पडत असल्याने पाण्याबरोबर दगड-माती येऊन दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने धोकादायक ठिकाणी पर्यटकांनी जाणे टाळावे. मद्यप्राशन केल्यास त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल. धबधब्याच्या ठिकाणी सेल्फी काढताना कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलिसांच्या वतीने पर्यटकांना करण्यात आले आहे.इलठण पाडा येथील ब्रिटिशकालीन असणाऱ्या धरणामध्ये उतरण्यास सक्त मनाई असून पोलिसांनी सुट्टीच्या दिवशी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

> “गवळी देव, सुलाई देवी डोंगर परिसर व इलठण पाडा येथील ब्रिटिशकालीन धरण या ठिकाणी मद्यप्राशन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. या ठिकाणी पर्यटकांसाठी सूचना फलक लावण्यात येणार आहेत. पर्यटनस्थळाच्या ठिकाणी सुट्टीच्या दिवशी कडक पहारा ठेवण्यात येत आहे.
>
> – संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे एमआयडीसी

# नऊ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून हत्या

## नराधमाला अटक

**भिवंडी** : शेजारी राहणाऱ्या एका नराधमाने नऊ वर्षांच्या चिमुरडीला खाऊचे आमिष दाखवून अत्याचार करत तिची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना भिवंडी शहरात घडली. या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात नवीन कायद्यानुसार गुन्हा दाखल करून पोलीस पथकाने फरार झालेल्या नराधम आरोपीला अटक केली आहे. अभय यादव (४२) असे अटक केलेल्या नराधमाचे नाव आहे.

मृत पीडित चिमुरडी भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील एका दुमजली चाळीत कुटुंबासह राहत होती. आई, वडील दोन मोठ्या बहिणी, एक भाऊ व सर्वात छोटी पीडिता, असे कुटुंब त्या ठिकाणी वास्तव्यास आहे. वडील यंत्रमाग कारखान्यात, तर गोदामात कामाला जाणारी आई आपल्या दोन्ही मोठ्या मुलींनाही सोबत कामाला घेऊन जात होती. तर भाऊ शाळेत जात होता. त्यातच गुरुवार, ५ जुलै रोजी हे कुटुंब नेहमीप्रमाणे कामाला गेले. मुलगा दुपारी शाळेत गेला असताना त्याच चाळीच्या वरच्या मजल्यावर एकटाच राहणाऱ्या



नराधमाने चिमुरडीस खाऊचे आमिष दाखवून आपल्या खोलीत बोलावले. खाऊच्या बहाण्याने मुलीवर नराधमाने अत्याचार करून धारदार वस्तूने वार करून तिची निर्घृण हत्या केली. दरम्यान, सायंकाळी शाळेतून मुलीचा भाऊ घरी आला तेव्हा खोलीला कुलूप बघून त्याने बहिणीला शोधले; पण ती सापडली नाही. त्यानंतर आई व मोठ्या बहिणी कामावरून घरी परतल्या. त्यांनी परिसरात शोधाशोध सुरू केली असता परिसरातील एका छोट्या मुलाने पीडित मुलीला ती राहत असलेल्या वरच्या मजल्यावरील खोलीत जाताना बघितल्याचे सांगितले. त्यानंतर कुटुंबीयांनी शोध घेतला असता बाहेरून कडी लावलेल्या एका खोलीत पीडितेचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडलेला दिसून आला.

या घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलीस ठाण्याचा पोलीस पथकाने घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करून चिमुरडीचा मृतदेह ताब्यात घेऊन तपासणीसाठी येथील शासकीय इंदिरा गांधी रुग्णालयात रवाना केला. त्यानंतर गुरुवारी रात्री उशिरा नवीन कायदा कलमानुसार पोलिसांनी सुरुवातीला अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून नराधम आरोपीला काही तासांतच अटक केली. दुसरीकडे चिमुरडीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात पाठवला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली. या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.

# उत्तर प्रदेशातून फरार असलेल्या आरोपीला पनवेल पोलिसांकडून अटक

**नवी मुंबई** : खुनाच्या प्रयत्नाचे दोन गंभीर गुन्हे करून उत्तर प्रदेशातून दोन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी बदलापूर येथून अटक केली. गौतम निर्मलप्रसाद गौड (३२) असे या आरोपीचे नाव असून, उत्तर प्रदेश सरकारने त्याच्यावर ५० हजार रुपयांचे बक्षीस ठेवले होते. उत्तर प्रदेश पोलिसांचे पथक त्याला घेऊन जाण्यासाठी नवी मुंबईत दाखल झाले आहे.

या प्रकरणातील आरोपी गौतम निर्मल प्रसाद गौड याने २०२२ मध्ये उत्तर प्रदेश राज्यातील गोरखपूर जिल्ह्यात खुनाच्या प्रयत्नाचे दोन गुन्हे केले होते. या आरोपीविरोधात उत्तर प्रदेशमधील झंगहा पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता. मात्र, गौड हा आरोपी त्यानंतर फरार झाला होता. तेव्हापासून उत्तर प्रदेश पोलीस त्याच्या मागावर होते. गौड सापडत नसल्याने पोलिसांनी त्याच्यावर ५०



हजार रुपयांचे बक्षीससुद्धा ठेवले होते. सध्या तो बदलापूर येथे लपून राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उत्तर प्रदेश गोरखपूर येथील एस.टी.एफचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यप्रकाश सिंग यांनी याबाबत पनवेल शहर पोलिसांना फोनद्वारे कळवले होते.

या आरोपीने पनवेल तसेच नवी मुंबई भागात काही गुन्हे केले असल्याची शक्यता असल्याने परिमंडळ-२चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल केदार व त्यांच्या पथकाने बदलापूर येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत उत्तर प्रदेशमध्ये गुन्हे करून फरार झाल्यानंतर तो सेंट्रिंगचे काम करून बदलापूरमध्ये पत्नीसह राहत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी गौतम गौड याला बुधवारी झंगहा पोलीस ठाण्याच्या अटक वॉरंटमध्ये अटक केली. त्याला पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने त्याची तळोजा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

गुरुवारी नवी मुंबईत दाखल झालेल्या उत्तर प्रदेश पोलिसांच्या पथकाने पनवेल शहर पोलिसांच्या मदतीने आरोपी गौतम गोड याचा ट्रान्सिट रिमांड मिळवून त्याला उत्तर प्रदेश येथे नेण्याची कार्यवाही सुरू केली आहे. ही कारवाई पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल केदार, पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे व त्यांच्या पथकाने केली.

# क्रेडिट कार्डवर रिवार्ड पॉईंट देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**मुंबई** : लालबाग, चिवडा गल्लीमध्ये राहणाऱ्या एका ३२ वर्षीय व्यावसायिकाला क्रेडिट कार्ड अपडेट करून लिमीट वाढवून रिवार्ड मिळवून देतो, असे भासवत सायबर ठगाने ९१ हजारांना चुना लावला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून काळाचौकी पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

चिवडा गल्लीतील रहिवासी दीपक हे २४ मे रोजी कामानिमित्त राजस्थान येथे गेले होते. या वेळी त्यांना अनोळखी व्यक्तीने कॉल करत इंडसइंड बँक सर्व्हे विभागमधून बोलत असल्याची बतावणी केली. त्याने दीपक यांना त्यांचे इंडसइंड बँकचे क्रेडिट कार्ड अपडेट करण्याबाबत माहिती देत कस्टमर केअरमधून फोन येईल, असे सांगितले. तीन दिवसांनी दीपक यांना एका मोबाईल नंबरवरून कॉल आला. त्याने दीपक यांना गुगलवर इंडसइंड बँकेची वेबसाईट ओपन करण्यास सांगितली. त्यांनी वेबसाईट ओपन केली आणि त्या तोतया बँक कर्मचाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे क्रेडिट कार्ड नंबर आणि सीव्हीव्ही नंबर भरले. त्यानंतर लगेचच त्यांच्या क्रेडिट कार्डवरून ९१ हजार ४८६ रुपये लंपास केले. दीपक यांनी कस्टमर केअर नंबरवर कॉल करून विचारणा केली असता बँकेतून कोणताही कॉल केला गेला नसल्याचे सांगितले. आपली ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने दीपक यांनी काळाचौकी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# तोतया आरपीएफ जवानाला रेल्वे पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**कल्याण** : मेल एक्स्प्रेसमध्ये आरपीएफचा युनिफॉर्म घालून झोपलेल्या एका तरुणाकडे टीसीने ओळखपत्र मागितले. हे ओळखपत्र बनावट असल्याचे लक्षात येताच या तोतया आरपीएफ जवानाला कल्याण रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. रोहन उतेकर असे त्याचे नाव असून, चौकशीदरम्यान त्याने अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत.

मुंबई-चेन्नई एक्स्प्रेस कल्याणच्या दिशेने येत असताना एस-१ बोगीत एका सीटवर आरपीएफ जवान झोपला होता. टीसीने त्याच्याकडे ओळखपत्र मागितले. मात्र, ते बनावट असल्याचे टीसीच्या लक्षात आले. त्यांनी ही माहिती कल्याण आरपीएफ आणि कल्याण लोहमार्ग पोलिसांना दिली. यानंतर पोलिसांनी रोहन उतेकरला कल्याण रेल्वे स्थानकात ताब्यात घेतले. तो पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील माऊली वस्ती कानगावचा राहणारा आहे. चौकशीदरम्यान त्याने केलेल्या खुलाशामुळे पोलीस देखील थक्क झाले. एका व्यक्तीने रोहनकडून सहा लाख रुपये घेतले. तो रोहनला आरपीएफमध्ये कामाला लावणार होता. रोहनसह त्याच्या आठ नातेवाईकांचे पैसे देखील त्या व्यक्तीला दिले आहेत. रोहनची त्या व्यक्तीशी ओळख अहमदनगर येथील एका खासगी पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या डायरेक्टरने करून दिली होती. त्रिदल पोलीस अकादमी नगरच्या डायरेक्टरने ही भेट घालून दिली होती. या डायरेक्टरने देखील सहा लोकांचे पैसे दिले आहेत. जवळपास १०० पेक्षा अधिक जणांकडून त्या व्यक्तीने आरपीएफमध्ये नोकरी लावण्याच्या नावाखाली पैसे उकळले आहेत. इतकेच नव्हे तर रोहन उतेकरसह काही तरुणांना कोलकाता येथे नेऊन त्यांची मेडिकलही करण्यात आली. बिहारच्या पाटणा येथे तीन महिने ठेवून त्यांचे ट्रेनिंगही घेतले. या तरुणांनी आमची आरपीएफमध्ये भरती केव्हा होणार? अशी विचारणा केली असता, तो त्यांना कोणत्या ना कोणत्या रेल्वे कार्यालयात घेऊन जायचा. परंतु नोकरी अद्याप लागली नव्हती. याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे पोलीस या भामट्याचा शोध घेत आहेत.

# डिस्काऊंट मिळत नसलेले क्रेडिट कार्ड बंद करणे पडले महागात

**मुंबई** : व्यवहारांवर सूट (डिस्काऊंट) मिळत नसल्याने क्रेडिट कार्ड बंद करणे एका शिक्षिकेला चांगलेच महागात पडले आहे. सायबर ठग महिलेने ब्लॉक केलेले क्रेडिट कार्ड ब्लॉक झाले नसल्याचे सांगून शिक्षिकेच्या दुसऱ्या बँकेतील क्रेडिट कार्डवरून ८२ हजार रुपये लंपास केले आहेत. या सायबर फसवणूकप्रकरणी सांताक्रुझ पोलीस अधिक तपास करत आहेत.

सांताक्रुझ पश्चिमेकडील रिलीफ रोड परिसरात कुटुंबासोबत राहात असलेल्या ज्योती या कॉम्प्युटर क्लासमध्ये शिक्षिका आहेत. त्यांनी महिनाभरापूर्वी आर.बी.एल. बँकेचे एक क्रेडिट कार्ड दैनंदिन वापरासाठी घेतले. पण क्रेडिट कार्डवरून कोणताही व्यवहार केला तरी त्यांना कोणत्याही प्रकारचे डिस्काऊंट मिळत नव्हते. त्यामुळे त्यांनी हे कार्ड बंद करण्याचा निर्णय घेतला. ज्योती यांनी २८ जूनला आर.बी.एल. बँकेच्या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून हे कार्ड बंद करण्यासाठी ब्लॉक केले. दुसऱ्या दिवशी दुपारी त्यांना एका अनोळखी महिलेने कॉल केला. तिने आर.बी.एल. बँकेतून बोलत असल्याचे सांगत बँकेचे क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी ब्लॉक केले आहे, ते अद्यापपर्यंत ब्लॉक झालेले नाही. ते कार्ड पुन्हा एकदा ब्लॉक करावे लागेल, असे तिने सांगितले. तुम्ही आर.बी.एल. बँकेतून बोलत आहात तर तुम्हीच कार्ड ब्लॉक करा, असे ज्योती यांनी तिला सांगितले. त्या महिलेने कार्ड ब्लॉक करण्यासाठी ज्योतीकडे चालू असलेल्या अन्य बँकेचे स्टेटमेंट आणि क्रेडिट कार्डचा तपशील मागितला. तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून ज्योतीने तिच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या क्रेडिट कार्डचा नंबर दिला. पुढे तिने ज्योतीकडून जन्मतारीख, कार्डवरील वैधता तारीख, सीव्हीव्ही क्रमांक, मोबाईलवर आलेला व्हेरीफिकेशन कोड आणि ओटीपी नंबर घेत तिच्या क्रेडिट कार्डमधून ८२ हजार रुपये लंपास केले. त्यानंतर मात्र आपली सायबर फसवणूक झाल्याची ज्योती यांची खात्री पटल्याने त्यांनी सांताक्रुझ पोलीस ठाणे गाठून अनोळखी महिलेविरोधात तक्रार दिली आहे.

# भारतीय क्रिकेट संघाच्या विजयोत्सवात सहभागी ६४ क्रिकेटप्रेमींचे मोबाईल हरवले

**मुंबई** : ४ जुलै रोजी विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाचा विजयोत्सव साजरा करण्यासाठी वानखेडे स्टेडियम, चर्चगेट, मरिन ड्राईव्ह आणि नरिमन पॉईंट येथे आलेल्या ६४ क्रिकेटप्रेमींचे मोबाईल हरवले आहेत. याबाबत ४ ऑनलाइन आणि ६० लेखी तक्रारी मरिन ड्राईव्ह पोलिसांकडे आल्या असून, हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. मोबाईलच्या तपशीलाच्या आधारे पोलीस हरवलेल्या मोबाईल फोन्सचा शोध घेत आहेत.

'टी-२०' विश्वचषक जिंकलेल्या भारतीय संघाचा विजयोत्सव गुरुवार, ४ जुलै रोजी वानखेडे स्टेडियमवर साजरा करण्यात आला. त्याआधी खुल्या बसमधून खेळाडूंची मिरवणूक काढण्यात आली. विजयोत्सव साजरा करण्यासाठी सुमारे चार लाख क्रिकेटप्रेमींनी गर्दी केली. लाखोंच्या संख्येने आलेल्या चाहत्यांच्या गर्दीला हाताळताना मात्र पोलिसांची दमछाक झाली. पोलिसांनी योग्य नियोजन केल्याने कोणतीही अनुचित घटना घडली नाही. गर्दीत श्वास गुदमरल्याने १० ते १२ जण बेशुद्ध पडले. त्यांच्यावर उपचार करून सोडण्यात आले, तर गर्दीमध्ये हरवलेल्या १३ अल्पवयीन मुलांच्या पालकांचा शोध घेऊन पोलिसांनी मुलांना त्यांच्या ताब्यात दिले आहे. गर्दीत अनेकांचे मोबाईल हातातून खाली पडत होते. या मोबाईलवर चोरट्यांनी हात साफ केल्याची शक्यता आहे.

# बनावट कागपत्रांद्वारे परदेशात पाठविणाऱ्यांचा 'टेरर अँगल' तपासणार

**मुंबई** : भारतीय नागरिकांना टुरिस्ट व्हिसावर दक्षिण कोरियाला पाठविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर आता गुन्हे शाखेच्या गुन्हेगारी गुप्तचर पथक (सीआययू) हे प्रकरण दहशतवाद्यांशी संबंधित आहे का, याची तपासणी करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ते संबंध सापडल्यास आरोपींच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट पदावर कार्यरत असलेला ब्रह्म ज्योती हा त्याचा वर्गमित्र आणि सहकारी नौदल अधिकारी लेफ्टनंट विपीनकुमार डागर आणि जवळची मैत्रीण असलेल्या सिमरन तेजी यांच्या मदतीने हे रॅकेट चालवत होता. सीआययूने या तिघांसह रवी कुमार आणि दीपक डोगरा यांना अटक केली आहे. एकीकडे भारतातून नागरिकांना अवैधरीत्या दक्षिण कोरियाला पाठविण्यात येत होते. तर, दुसरीकडे पाकिस्तान आणि बांगलादेशमधून मोठ्या प्रमाणात नागरिक कामासाठी व्हिसा घेऊन दक्षिण कोरियामध्ये जात आहेत. यातील बहुसंख्य हे दक्षिण कोरियातील सुंदरी भागात वास्तव्यास आहेत. येथे भारतातून गेलेल्यांची भेट पाकिस्तान आणि बांगलादेशमधून येणाऱ्यांशी होत असल्याने याप्रकरणात सीआययू दहशतवादी संबंधांची तपासणी करणार असल्याची माहिती मिळते. नौदल अधिकारी ब्रम्ह ज्योती याच्या टोळीने मुंबई आणि चेन्नई येथून आठ जणांना टुरिस्ट व्हिसावर दक्षिण कोरियाला पाठविले आहे. मात्र, यातील दोघांना दक्षिण कोरियाने ताब्यात घेऊन माघारी धाडले. ते जम्मू-काश्मीरचे रहिवासी असून, सीआययूचे पथक लवकरच या दोघांचा जबाब नोंदविणार आहे. १२ जणांच्या बनावट बनविलेल्या कागदपत्रांचा संशय आल्याने कोरियन दूतावासाने त्यांना टुरिस्ट व्हिसा नाकारल्याचे सीआययूने केलेल्या तपासात समोर आले आहे. सीआययूने डागर याच्याकडून एकूण १४ पासपोर्ट जप्त केले आहेत. त्याच्या खात्यात ४० लाखांहून अधिक रक्कम आणि सिमरन तेजीच्या खात्यातही मोठ्या प्रमाणात रक्कम सापडली आहे. त्याआधारे सीआययूचे अधिकारी डागर, ब्रम्ह ज्योती आणि सिमरनकडे कसून चौकशी करत आहेत.

सीआययूने अटक केलेला रवी कुमार हा ९वी पास असून, कारपेंटर आहे. त्याला दातांचा डॉक्टर बनवून दक्षिण कोरियाला पाठवण्याचा प्रयत्न सुरू होता. रवी कुमार हा मूळचा जम्मूचा असून, त्याचे बँक खातेही तेथील आहे. पण, तो नाशिकमध्ये प्रॅक्टीस करत असल्याचे दाखवले होते. रवी कुमार हा जम्मू-काश्मीरचा असल्याने त्याला दूतावासाकडून परवानगी दिली जात नव्हती. रवी कुमार आपला भाऊ आहे, असे सांगून डागर हा दूतावासातील अधिकाऱ्यांशी भांडला होता. त्यामुळेच याप्रकरणाचा भांडाफोड झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. सीआययूने अटक केलेला पाचवा आरोपी दीपक डोगरा हा २०१७ साली दक्षिण कोरियामध्ये गेला होता. त्याच्या मामाने त्याला दक्षिण कोरियाला पाठवले होते. डोगरा हा दक्षिण कोरियामध्ये सुरुवातीला चिकन कटिंग करण्याच्या कामासाठी राहिला. कोरोना काळात तो भारतात परत आला. त्यानंतर तो विपीन डागर आणि ब्रम्ह ज्योती यांच्याशी जोडला जाऊन लोकांना दक्षिण कोरियात पाठवू लागल्याचे उघड झाले आहे.

# ९ वर्षे प्रेमसंबंध ठेवून प्रियकराने लग्नास नकार दिल्याने प्रेयसीची आत्महत्या

## प्रियकरावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा

**नवी मुंबई** : नाशिक येथे राहणाऱ्या एका तरुणाने पनवेल येथील २७ वर्षीय तरुणीसोबत ९ वर्षे प्रेमसंबंध ठेवून, तिच्या सोबत वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवून अचानकपणे तिच्या सोबत लग्न करण्यास नकार दिल्याने मानसिक तणावाखाली आलेल्या यातील तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी विजय प्रकाश गोरे (२८) याच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील मृत तरुणी पनवेल येथे तर आरोपी प्रियकर विजय गोरे हा नाशिक ओझर येथे राहण्यास आहे. २०१६ मध्ये या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू



झाले होते. यादरम्यान विजय गोरे याने तरुणीसोबत अनेक वेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले. त्यानंतर २०२० मध्ये दोघेही लग्न करणार असल्याचे तरुणीने आपल्या आई-वडिलांना सांगितले होते. या दोघांच्या लग्नास तरुणीच्या आई-वडिलांनी होकार दिला होता. गेल्या ९ वर्षांपासून या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू होते. त्यानंतर गत मे महिन्यामध्ये विजयने त्याच्या आई-वडिलांचा त्यांच्या लग्नास विरोध असल्याचे तसेच त्यांनी दुसऱ्या मुलीसोबत त्याचे लग्न करण्याची तयारी सुरू केल्याचे तरुणीला सांगून लग्नास नकार दिला होता.

त्यानंतर तरुणीने आपल्या बहिणींसह नाशिक येथे जाऊन विजय गोरे याची भेट घेऊन त्याला लग्न न करण्यामागचे कारण विचारले होते. त्यावेळी विजय गोरे याने वेगवेगळी कारणे सांगून तिच्या सोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर या तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी विजय गोरे याला चौकशीसाठी बोलावून घेतले होते, मात्र तो पोलीस ठाण्यात सुद्धा हजर झाला नाही. त्यानंतर खचलेल्या या तरुणीने कामावर जाणे सुद्धा बंद केल्याने ती मानसिक तणावाखाली आली होती. याच मानसिक तणावातून या तरुणीने गेल्या २३ जून रोजी दुपारी घरामध्ये कुणीही नसताना बेडरूममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. यावेळी तरुणीने आत्महत्येपूर्वी आपल्या दोन बहिणींसाठी तसेच विजय गोरे याच्यासाठी अशा ३ चिठ्ठ्या लिहून ठेवल्याचे आढळून आले. विजय गोरे याच्यासाठी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये तरुणीने अनेक गोष्टी लिहून ठेवल्याचे आढळून आले. यावरून विजय गोरे याने दिलेल्या मानसिक त्रासामुळे तरुणीने आत्महत्या केल्याचे आढळून आल्यानंतर तरुणीच्या कुटुंबीयांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात विजय गोरे याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

# परदेशात नोकरी देण्याच्या बहाण्याने तरुणीकडून उकळले सव्वापाच लाख रुपये

**नवी मुंबई** : परदेशात नर्स म्हणून नोकरीचे आमिष दाखवून ऐरोलीतील २६ वर्षीय तरुणीची ५ लाख २० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. ही फसवणूक करणाऱ्या भामट्याचे नाव बिबिन जॉर्ज असे असून रबाळे पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

ऐरोलीत कुटुंबासह राहणाऱ्या फिर्यादी तरुणीने बीएससी नर्सिंगचे शिक्षण घेतले आहे. सध्या ती एका ठिकाणी स्टाफ नर्स म्हणून काम करत आहे. आरोपी बिबिन जॉर्ज हा मूळचा केरळ राज्यातील असून, पूर्वी तो फिर्यादीच्या मोठ्या




बहिणीसोबत एका कॉल सेंटरमध्ये काम करत होता. त्या निमित्ताने त्याचे या तरुणीच्या कुटुंबीयांसोबत चांगली ओळख होती. २०२१ मध्ये बिबिन याने परदेशात नर्सिंगची नोकरी मिळवून देणारी एक एजन्सी त्याच्या ओळखीची असून, त्यासाठी चार ते पाच लाख रुपयांचा खर्च येईल, असे या तरुणीला सांगितले होते.

तरुणीने परदेशात नोकरीला जाण्याची तयारी दर्शवून त्याला दीड लाख रुपये दिले. त्यानंतर बिबिन याने तरुणीला परदेशातून मुलाखतीसाठी फोन येत असल्याचे भासवून स्वतःच तिची ऑनलाईन मुलाखत घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये त्याने तरुणीच्या ई-मेलवर बनावट ऑफर लेटर पाठवून दिले आणि व्हिसाच्या प्रक्रियेसाठी पैसे पाठवण्यास सांगितले. तरुणीने बिबिनवर विश्वास ठेवून त्याला ३ लाख ७० हजार रुपये ऑनलाईन पाठवून दिले. मात्र, त्यानंतर बिबिन याने तरुणीला टाळण्यास सुरुवात केली. या तरुणीला संशय आल्यानंतर तिने ई-मेलवर आलेल्या ऑफर लेटरची खात्री केली असता, सदरचे पत्र बनावट व बोगस असल्याचे समजले. तसेच ज्या नंबरवरून तिचा इंटरव्यू घेण्यात आला, तो नंबर बिबिनचाच असल्याचे स्काईप आयडीवरून तिला समजले. त्यानंतर तरुणीने बिबिनकडे त्याबाबत चौकशी केली असता, त्याने तरुणीला तिचे ५ लाख २० हजार रुपये परत करण्याचे आश्वासन दिले. मात्र, बिबिन याने आजपर्यंत या तरुणीला पैसे परत केले नाहीत. अखेर या तरुणीने रबाळे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# मुख्यमंत्री कोट्यातून म्हाडाच्या सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवत फसवणूक

**मुंबई** : मुख्यमंत्री कोट्यातून पवई म्हाडा कॉलनी येथे म्हाडाच्या सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवत मित्राने झवेरी बाजारमधील सोन्याच्या व्यापारी मित्राची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून कांदिवली पोलीस अधिक तपास करत आहेत.बोरिवली पूर्वेकडील एम. जी. रोड परिसरात राहात असलेल्या ५६ वर्षीय तक्रारदार यांचा झवेरी बाजारमध्ये सोन्याचे दागिने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांच्या एका मित्राने चष्मा फ्रेम बनवणाऱ्या व्यावसायिक निखिल दोशी याच्याशी त्यांची ओळख करून दिली. पुढे दोघांची चांगली मैत्री झाली. जुलै २०२० मध्ये दोशी याने पवई म्हाडा कॉलनी येथे म्हाडाच्या




सदनिका विक्रीसाठी आहेत.म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत आपली चांगली ओळख असून, मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका मिळवून देण्याचे आमिष दोशी याने तक्रारदार यांना दाखवले. सदनिका घ्यायची असल्यास सुरुवातीला ३ लाख रुपये भरावे लागतील आणि नंतर ३० वर्षांपर्यंत ३० ते ४० हजार रुपये हफ्ते भरावे लागतील, असे सांगितले. सदनिका अलॉटमेंटचे काम म्हाडाचे अधिकारी विलास चव्हाण हे करणार असून, सहा महिन्यांत सदनिका ताब्यात मिळेल, असे आश्वासन दिले. दोशी याच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन तक्रारदार यांनी दोन सदनिका घेण्याचा निर्णय घेतला. तक्रारदार यांनी त्याला ६ लाख रुपये पोच केले. सदनिका आज-उद्या मिळेल, असे सांगत अखेर म्हाडाचे अधिकारी विलास चव्हाण यांनी ४० जणांची नावे असलेली एक यादी पाठवली. यात तक्रारदार यांचे नाव होते. यादीवर कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नव्हती. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री पटली. अखेर त्यांनी कांदिवली पोलीस ठाणे गाठून फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# संपादकीय

## जीवनाशी घेती पैजा...



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

भौतिकाचा अतिरेकी आघात असह्य झाला की जगण्याचा संघर्ष अधिकच जीवघेणा वाटू लागतो आणि या संघर्षात दिलाशाची फुंकर मारणाऱ्या एखाद्या सहजसोप्या उपायाचा शोध सुरू होतो. मानवी विकासाच्या वाटा विस्तारत गेल्या तसतसा अशा उपायांचा प्रभाव कमी होत गेला आणि सहजपणे साध्य होणाऱ्या हलक्याफुलक्या उपायांतही माणूस अध्यात्माचा प्रभाव शोधत गेला. बदलत्या पिढ्यांसोबत जीवनाची पारंपरिक मूल्ये बदलत गेली असली तरी परंपरांचा अपमान न करता नवेपणा शोधण्याचे माणसाचे आसुसलेपण मात्र वाढतच गेले आणि त्याला अध्यात्माचा एखादा सोपा सूर सापडत गेला. अध्यात्माचा आधार मिळाला की समस्यांनी गांजलेले मन खंबीर होते. समस्यांतून बाहेर पडण्याचे उपाय शोधणाऱ्या अभावग्रस्तांना अध्यात्माच्या असंख्य वाटा सापडतात आणि त्या वाटेचे वाटसरू जीवनातला हरवू पाहणारा आनंद शोधू लागतात. पण, समाधानाची किमान अपेक्षा म्हणून ज्याकडे पाहिले जाते, ती मनःशांती लाभावी याकरिता ज्या अध्यात्माचा मार्ग चोखाळावा, तो मार्गच जीवघेणा ठरून जगणे सुसह्य होणे तर दूरच, पण जगणेच भूतकाळात जमा व्हावे ही मोठी विचित्र परिस्थिती अलीकडच्या काळात आव्हान होऊन समोर उभी राहिली आहे. गेल्या काही दशकांत या परिस्थितीने अनेकवार, वेगवेगळ्या ठिकाणी आपली वेगवेगळी विक्राळ जीवघेणी रूपे दाखविली आणि अनेकांचा घास घेऊन त्यांना वर्तमानाच्या पटलावरूनच पुसूनही टाकले. असे काही झाले की, भाविकतेच्या भावनांवर प्रश्नचिन्हे उमटू लागतात, कोणाच्या पापाचे ओझे कोणाच्या खांद्यावर नियतीने टाकावे आणि कोणाच्या कृत्याची सजा कोणास द्यावी यासंबंधी निसर्गाचे, नियतीचे काही नियम असतात किंवा नाही, नियती त्या नियमांचे प्रामाणिक पालन करते किंवा नाही, असे प्रश्न उभे केले जाऊ लागतात. बदलत्या मानसिकतेमध्ये हे सहाजिकही असले, तरी अध्यात्माच्या या मार्गाच्या वाटसरूंचा पंथ विस्तारतच गेलेला दिसतो आणि अशा मार्गावरच कधीकधी संकट बनून दबा धरून बसलेल्या नियतीने जगण्याच्या समस्यांपासून मुक्तीचा असा विचित्र मार्ग दाखवावा हे दुःख मागे राहिलेल्यांच्या मनावर आघात करू लागते.

उत्तर प्रदेशातील हाथरस येथे मंगळवारी भाविकांच्या एका मेळाव्यात नियतीने असाच जीवघेणा धुडगूस घातला आणि काहीतरी निमित्त निर्माण करून अनावर गर्दीला जीवघेणा विळखा घालत सव्वाशेहून अधिक बळी घेतले. या दुःखद दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा अनेक जुनेच प्रश्न नव्याने ऐरणीवर आले आहेत. अशा दुर्घटनांनी भूतकाळाला जेव्हा जेव्हा विळखा घातला, तेव्हा तेव्हा याच प्रश्नांनी डोके वर काढले होते आणि भविष्यात अशा दुर्घटना घडून निष्पापांचे बळी जाऊ नयेत यासाठी उपाययोजना आखण्याच्या आणाभाकाही घेतल्या गेल्या होता. तरीही नियतीने त्यांना चकवा देऊन जीवघेणी संधी साधल्याने, नियतीच्या आव्हानास तोंड देण्यातील मानवी क्षमतेसमोर सहाजिक प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. उत्तर प्रदेशातील हाथरस येथे कोणा संत भोलेबाबाच्या सत्संगातून जगण्यातील समस्यांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य साधण्याच्या हेतूने जमा झालेल्या भोळ्या सात्विकांनी मानसिक दिलाशाचे काही क्षण अनुभवून परतीचा प्रवास सुरू केला असतानाच चेंगराचेंगरीच्या रूपाने काळाने त्यांच्यावर घाला घातला, असे त्या दुर्घटनेवरून दिसते. एखाद्या खाजगी कार्यक्रमासाठी गोळा होणारी अलोट गर्दी नियंत्रणाबाहेर गेली की, नियती आपला डाव साधते हे याआधीही अशा प्रकारच्या काही दुर्घटनांतून सिद्ध झाले होते. वर्षभरापूर्वीच्या एप्रिल महिन्यात महाराष्ट्रात मुंबईनजीक खारघर येथे अशाच एका सरकारी कार्यक्रमाच्या निमित्ताने जमलेल्या भाविकांच्या गर्दीलाही आलेल्या अशाच जीवघेण्या अनुभवाच्या जखमा अजूनही महाराष्ट्राच्या मनावर ओल्या आहेत. त्या गर्दीच्या व्यवस्थापनात नेमक्या कोणत्या त्रुटी राहिल्या, त्यातील नेमक्या कोणत्या त्रुटीचा फायदा संकटाने घेतला, त्या त्रुटींची जबाबदारी नेमकी कोणाची असे अनेक प्रश्न त्यानंतर उभे राहिले, त्याच्या उत्तरांचा शोध सुरूदेखील झाला, पण जगण्यातील समाधानाच्या शोधातील काही जीव मात्र जगण्याचाच निरोप घेऊन काळाआड जमा झाले हे वास्तव दुःखद होते. हाथरसमधील त्या दुर्घटनेनंतरही पुन्हा एकदा हेच प्रश्न पुढे येतील, चौकशीच्या निमित्ताने त्याची उत्तरे शोधली जातील आणि भविष्यात असे काही जीवघेणे प्रसंग घडू नयेत म्हणून त्या उत्तरांची अंमलबजावणी करण्याचे आदेशही दिले जातील. याआधी घडलेल्या अशाच दुर्दैवी घटनांनंतरच्या या प्रथेची पुनरावृत्ती होईल, पण कोणत्याही गर्दीच्या ठिकाणी दबा धरून बसलेल्या संकटास संधीच साधता येणार नये अशी ठोस उत्तरे मात्र अजूनही सापडलेलीच नाहीत. मुंबई महानगरातील उपनगरी रेल्वेस्थानके, रेल्वेस्थानकांतील अरूंद जिने व पूल, पर्यटनस्थळांवर होणारी गर्दी, प्रवासी स्थानकांवरील गर्दी अशा अनेक ठिकाणी हेच संकट दबा धरून बसलेले असते. संकटापासून बचाव करण्यासाठी एखाद्या जागेचा सुरक्षित म्हणून आश्रय घ्यावा तर तेथेच ते संकट प्रकटते आणि जीवघेणे हल्ले करते, हे अलीकडच्या होर्डिंग दुर्घटनेत मुंबईत दिसून आले आहे. गर्दीचे नियंत्रण आणि संकटांना संधी न देण्याच्या नेमक्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करताना कदाचित कठोर भूमिका घ्यावी लागत असेलही, पण त्याचे पालन करण्याचे लोकशिक्षण व्हायला हवे. अन्यथा, सुखाच्या शोधातील निष्पापांवर दुःखाचा घाला पडावा आणि मागे राहिलेल्यांनी दुःखाच्या वेदना झेलत जगावे हे घडतच राहील. हाथरसच्या दुर्घटनेचा हा धडा आहे, असे म्हणता येईल.

# पंख होते तो उड आते रे..

ग्रीक संस्कृतीमध्ये एक सुंदर कथा आहे. प्राचीन काळी ग्रीसमध्ये डेडेलस नावाचा एक अतिशय कुशल कारागीर राहत होता. स्थापत्यकला, शिल्पकला, सुतारकाम या सर्वच कलांमध्ये तो पारंगत होता. इकारस या आपल्या मुलासमवेत त्याने अनेक नवनवीन गोष्टी निर्माण केल्या होत्या, ज्याची कीर्ती सर्वत्र पसरू लागली. या बापलेकांना क्रेटाचा राजा मिनॉस यानं एक चक्रव्यूह बनवण्यासाठी बोलावलं. आपल्याकडं जसा नरसिंह आहे, तसा त्यांच्या संस्कृतीमध्ये अर्धा माणूस आणि अर्धा बैल असं मिनोटॉर नावाचं एक दुष्ट पात्र आहे. या मिनोटॉरला अडकवण्यासाठी चक्रव्यूह निर्माण केला जातो. या चक्रव्यूहाच्या बाहेर सगळीकडे समुद्र असतो आणि त्यावर मिनॉसचं नियंत्रण असतं, त्यामुळे एकदा चक्रव्यूहात अडकला की कोणाला त्यातून बाहेर पडता येणार नसतं.

मात्र, शिकारी जसा कधीकधी आपल्याच जाळ्यात अडकतो तसेच या बापलेकांबद्दल होतं. काही कारणास्तव राजाची या बापलेकांसोबत खपा मर्जी होते आणि त्या दोघांनादेखील त्यांनी बनवलेल्या चक्रव्यूहातच कैद केलं जातं. कैदेतून पळून जाण्यासाठी डेडेलस शक्कल लढवतो. पक्ष्यांचे पंख आणि मेण यांचा वापर करून तो स्वतःसाठी आणि मुलासाठी पंख बनवतो. ग्रीक संस्कृतीमध्ये सूर्याला हेलियस देव मानलं जायचं. 'आपण इथून उडतउडत क्रेटा राज्याबाहेर जाऊ, मात्र उडताना एक काळजी घे, हेलियस देवाच्या जास्त जवळ जाऊ नको, नाहीतर तुझ्या पंखावरचं मेण वितळून जाईल', अशी डेडेलस त्याच्या मुलाला ताकीद देतो. नवीन पंखाच्या साह्यानं बाप लेक दोघं या चक्रव्यूहातून उड्डाण करतात. मात्र, कैदेतून खूप दिवसांनंतर मुक्तता मिळाल्याच्या आनंदानं अतिउत्साही झालेला मुलगा अधिकाधिक उंच जात राहतो आणि शेवटी सूर्याच्या उष्णतेनं त्याचे पंख वितळतात. तो खाली समुद्रात पडतो आणि मरतो.

अर्थात, अशी मांडणी केवळ लोककथांमध्ये ठीक आहे, मात्र त्याला सत्य मानून आम्हीच कसे सर्व विद्यांचे जनक आहोत असे दावे किमान वैज्ञानिक विचारमंचावर तरी कटाक्षाने टाळायला हवे; अन्यथा मानवी उड्डाणासाठी ज्या व्यक्तींनी प्रयत्न केले, त्याच्या परिश्रमाला योग्य श्रेय जाणार नाही. इतिहासात कदाचित सर्व प्रयत्नांची नोंद नसेल, मात्र ज्ञात इतिहासात नवव्या शतकात जन्माला आलेल्या अब्बास इब्न फिर्नास यानं पक्षांप्रमाणे उडण्याचा पहिला प्रयत्न केला होता. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या सर्वांचा अभ्यासक असलेल्या इब्न फिर्नासनं आपल्या जाहीर उड्डाणाची कल्पना सर्वांना दिली होती. त्याचं उड्डाण पाहण्यासाठी स्पेनमधील हजारो नागरिक जमले होते. पाठीशी पंख बांधून त्यानं एका कड्यावरून उडी घेतली, मात्र नंतर त्याच्या पाठीला प्रचंड त्रास झाला आणि त्याचे लँडिंग काही यशस्वी होऊ शकले नाही. बगदाद आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्याचा उभारलेला पुतळा आज आपण पाहू शकतो.

MIRA BHAINDAR MUNICIAL CORPOTATION
Water Supply & Sewerage Department
Indira Gandhi Bhavan,Chatrapati Shivaji Maharaj Marg.
Bhayandar (W)401101,Tal.Dis – Thane,28192828
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

No.MNP/WS & Sew/02/2024-25 Date – 05/07/2024

// Re- Tender Notice //

Mira – Bhayander Municipal Corporation's Water Supply Department has invited the Re – tender for various works under water supply. The Re – tender documents are available on www.mahatenders.gov.in website from 09/07/2024 to 18/07/2024 till 12.00 hrs. Tender shall submitted on www.mahatenders.gov.in website on or before 18/07/2024 upto 1.00 hrs
Ref. No.:- MBMC|PRO|E2285545|2024-25
Date :- 05/07/2024

Place :- Bhaindar
Date :- 05/07/2024

(Deepak Khambit)
City Engineer
Mira Bhaindar Municipal Corporation

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती (ई), नालासोपारा (पश्चिम)
मुख्य कार्यालय विरार
दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./९११/२०२३-२४
दिनांक :- ०२.०७.२०२४

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा कर दात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन कर दात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे-१२ | NL२१/१६०/२ | ४९३ | सुरेश लटके | अनंत तानाजी जोंधळे व विनोद नारायण कानाळे |
| २ | आचोळे-१२ | NL२१/२२६/३ | ५०३ | तांडेल भारत आत्माराम | श्यामल असित बेरा व कृष्णा श्यामल बेरा |
| ३ | आचोळे-१२ | NL२१/२५/२६ | ५३६ | आकाश लॅण्ड डेव्ह. | रेखा अनिश तिवारी व अनिश डी. तिवारी |
| ४ | आचोळे-१२ | NL२१/२९८/१७ | ४६२ | श्रीलया केशव शेट्टी | मो. रिजवान मो. रजीउद्दीन शेख समिना मो. अर्शद शेख |
| ५ | आचोळे-१२ | NL२१/३९७/२४ | ४६० | शादाब अहमद कुरेशी | सुनिल केवट |
| ६ | आचोळे-१२ | NL२१/१२८/५९ | ४०८ | सिध्देश गणेश महाडीक व संतोष गणेश महाडीक | पवित्र नारायण लल्लन मिश्रा व मिनु पवित्र मिश्रा |
| ७ | आचोळे-१२ | NL२१/३१९/२९ | ५५९ | बद्रे दानिश खान | सई संतोष डांगे |
| ८ | आचोळे-१२ | NL२१/२८२/१७ | ५९९ | अबुबकर अन्सारी | मोहम्मद सलमान अबुबकर अन्सारी |
| ९ | आचोळे-१२ | NL२१/३५३/३४ | ५८३ | संगीतादेवी रामप्रसाद चौरसिया | मोहम्मद शाहजादे सदरुद्दीन शाह |
| १० | आचोळे-१२ | NL२१/२६८/२ | ५८० | परबेझ हूसेन | सतिश सिताराम भोईर |
| ११ | आचोळे-१२ | NL२१/१६२/५१ | ६०६ | सुभाष किसन पंडीत | राहूल ओमकार पांडे |
| १२ | आचोळे-१२ | NL२१/२३/५५ | ६९४ | जिवन चेतना सोसायटी | हरीश गोविंदराम लालवानी व मुकेश गोविंदराम लालवानी |
| १३ | आचोळे-१२ | NL२१/९२/३२ | ७०० | संजीव अनंत उंबरकर | रविकुमार गुप्ता |
| १४ | आचोळे-१२ | NL२१/४१२/२४ | ६८९ | परमिंदर सिंग | संदीप रामपदा मंडल व तनुजा संदीप मंडल |
| १५ | आचोळे-१२ | NL२१/१५/२७ | ७३८ | विजय तुळशिराम पवार | रामप्रसाद अध्यप्रसाद उपाध्याय |
| १६ | आचोळे-१२ | NL२१/१४३/१३ | ८११ | वेदप्रकाश आमआसरे पांडे | अनिता देवी श्यमबदन गोंड |
| १७ | आचोळे-१२ | NL२१/३८९/५५ | ८३६ | डॉ. गिरधान पोपटलाल गडा | रजाउररहमान अजिजुद् रहमान अन्सारी |
| १८ | आचोळे-१२ | NL२१/७५/६ | ९१३ | महादेव शंकर मोरे | विनोद कुमार बनवारी शाह व चंपा विनोदकुमार गुप्ता उर्फ शाह |
| १९ | आचोळे-१२ | NL२१/२३/५१ | १०४२ | जिवन चेतना सोसा., | सतिश महादेव शिंदे |
| २० | आचोळे-१२ | NL२१/८५/७ | ९०५ | सुदर्शन ल. मेळेकर | रमेश कुमार लालमनी यादव |

सही /-

(निता कोरे)
प्र. सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

# वेगळ्या वाटेवरच्या विज्ञानकथा

सन १९७५ च्या साहित्य संमेलनात दुर्गाबाई भागवतांनी जयंत नारळीकरांच्या विज्ञान कथांची दखल घेतली. तेव्हापासून विज्ञानकथा या साहित्य प्रकाराकडे मराठीत गांभीर्याने पाहिलं जाऊ लागलं. जयंत नारळीकरांबरोबरीनेच निरंजन घाटे, बाळ फोंडके लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर यांच्या विज्ञान कथांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. विज्ञानाच्या प्रगतीची भविष्यकाळात मांडणी करून मानवी नातेसंबंध, समाज यामध्ये पडणारा फरक ललित अंगाने या विज्ञान कथांमधून मांडला गेला आहे. मराठी विज्ञान कथांच्या दालनात डॉ. संजीव कुलकर्णी यांचा 'शास्त्रकाट्याची कसोटी' हा कथासंग्रह दाखल झालेला आहे. या कथासंग्रहातील बऱ्याचशा विज्ञानकथा या पर्यावरण, प्राणी व मानव यांच्या परस्पर संबंधांवर आधारित आहेत. हाच या कथासंग्रहाचा वेगळेपणा आहे.

या कथासंग्रहातील 'वाजे पाउल आपले' ही पहिलीच कथा मानव व हत्ती संघर्षावर आधारित आहे. हत्ती आपल्या पायांनी एकमेकांना जमिनीतून वेगवेगळे संदेश पाठवतात. याचाच उपयोग करून हत्तींना मानवी वस्तीपासून दूर हवे तिकडे पाठवण्यासाठी वेगवेगळ्या लहरी जमिनीतून पाठवण्याची कल्पना मांडली आहे, खरं तर ही आज कल्पना वाटत असली तरी भविष्यातील हत्ती-मानव संघर्षावर कदाचित हा एक तोडगा असू शकेल. कथेची मांडणी ही वन अधिकारी, आदिवासी आणि संशोधक यांच्या परस्पर संबंधातून गुंफली गेली आहे. सुगंधी पदार्थांच्या उत्पादनासाठी व्हेल माशाची उलटी वापरली जाते आणि त्याचसाठी व्हेल माशांची मोठ्या प्रमाणात शिकारही केली जाते. व्हेल माशांची शिकार रोखायची असेल तर व्हेल माशाच्या पोटात हा उलटी सदृश्य पदार्थ तयारच होऊ द्यायचा नाही व त्यासाठी विशिष्ट जीवाणू जगभरच्या व्हेलच्या पोटात सोडायचे ही भन्नाट कल्पना घेवून 'प्रथमावतार' ही कथा लेखकाने फुलवली आहे. मानवी आहारातील प्रथिनांची कमतरता भरून काढण्यासाठी कीटकांचा वापर खाद्य पदार्थात करण्याची कल्पना आणि कीटकांनी स्वतःचा वंश वाचवण्यासाठी विषारी कोशिका निर्माण करणे व त्यातून माणसाला विषबाधा होणे ही सुद्धा अशीच एक आगळीवेगळी कल्पना. या अशा कल्पना ललित अंगाने फुलवणे हेच विज्ञान कथेत आव्हान असते. या कथांमधून लेखकाने हे आव्हान समर्थपणे पेलले आहे. कीटकांप्रमाणेच गिधाडासारखा पक्षी स्वतःचे रक्षण करण्यासाठी आपले भक्ष्य पकडण्याची पद्धत कसा बदलतो व मानवासमोर आव्हान उभे करतो, हे रंजक शैलीत मांडले आहे.

माणसाच्या मनात शिरून त्याच्या अवचेतन मनात एखादं बीज त्याच्या नकळत पेरण ही संकल्पना आता मोठ मोठ्या निवडणूक तंत्रात वापरली जाते. हीच संकल्पना जाहिरातीत कशी वापरली जाऊ शकते हे 'दिखाए दिये यु' या कथेतून समजते. विज्ञानाच्या सहाय्याने मानसिक आजारावर मिळवलेला विजय लेखकाने 'मन काळोखाची गुंफा' या कथेत अतिशय बारकाईने मांडला आहे. विज्ञानाची साथ आणि जवळच्या व्यक्तीचा भक्कम आधार मानसिक आजार झालेल्या रुग्णाला कसा बरा करतो हे जीवन आणि जागृती या पती-पत्नीच्या लोभस नातेसंबंधातून मांडला आहे. कोविडच्या महाभयंकर साथीनंतर जगभरच्या माणसांना आयुष्याची क्षणभंगुरता लक्षात आली. त्याचा उलटा परिणाम झाला. आहे ती संसाधनं ओरबाडण्याची वृत्ती माणसांमध्ये वाढली. या प्रवृत्तीवर अंकुश ठेवण्यासाठी जगभर दुष्काळ निर्माण करण्याची आवश्यकता जगभरच्या देशांच्या प्रमुखांना वाटायला लागते. ते सगळे मिळून पॅसिफिक महासागरात उष्ण पाण्याचा प्रवाह तंत्रज्ञानाच्या सहाय्याने निर्माण करतात. त्यातून निर्माण होणाऱ्या दुष्काळामुळे जगभरातील लोकांना संसाधनाचं महत्त्व समजून येतं हे 'बाळ येशू' या कथेत मांडलं आहे. काही कथांमधून लेखक विशिष्ट समस्यांवर वैज्ञानिक तोडगे सुचवत कथा फुलवतो, तर काही कथांमधून विज्ञानाचा उपयोग मूठभर लोकांच्या स्वार्थासाठी व पर्यायाने मानवजातीच्या विध्वंसासाठीही कसा केला जाऊ शकेल, याचा इशारा 'शठे शाठ्यं समाचरेत' या कथेमधून दिलेला आहे. मोबाईलमधून विशिष्ट किरणोत्सर्ग पुरुषांच्या शरीरात सोडून त्याच्या शरीरातील एक्स क्रोमोझोम दुबळे करायचे आणि फक्त मुलगेच जन्माला घालायचे. मुली जन्माला येवूच द्यायच्या नाहीत. लेखकाने हे जरी आज या काल्पनिक कथेत मांडले असले तरी विज्ञानाचा उपयोग अशा तऱ्हेनेही होऊ शकेल हे नाकारता येणार नाही.

या कथासंग्रहाची एकच कमतरता जाणवते, ती म्हणजे कथेतील व्यक्तिरेखा या तपशिलात हरवल्यासारख्या वाटतात. अपवाद 'दिखाए दिये यु' या कथेतील बाबा या व्यक्तिरेखेचा. परंतु, विज्ञान कथेत तपशिलाला अधिक महत्व असणार हे ही गृहीत धरावे लागते. तपशील जरी अधिक प्रमाणात आले तरी कथानकातील उत्कंठेचा धागा तुटू द्यायचा नाही, हे आव्हान लेखकाने बहुतेक कथांमधून पेलले आहे.

## डोळ्यात कचरा गेल्यावर करा ‘हे’ उपाय

डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदूषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहोचू शकते. वातावरणातील धूलिकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

▮सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.

▮डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.

▮डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असताना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरू नये.

▮डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

▮अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते, अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.



## केस आणि त्वचेसाठी औषधी तेल



सध्या केसांच्या समस्या वाढताना दिसताहेत. प्रदूषणाचं प्रमाण वाढत असताना केस आणि त्वचेवर त्याचा स्पष्ट परिणाम दिसतो. मात्र केसांवर अधिक परिणाम दिसण्याची अनेक कारणं आहेत. सध्या केसांचं सौंदर्य आणि स्वच्छता राखताना अनेक रसायनयुक्त प्रसाधनांचा वापर वाढतोय. दर्जा न बघता खरेदी केलेली अशी प्रसाधनं केसांच्या मुळांनाच हात घालतात. तीव्र प्रसाधनांमुळे केसांची मुळं कमकुवत होतात, केसांचा पोत बिघडतो आणि तक्रारींची मालिका सुरू होते. यावर उपाय म्हणून आठवड्यातून एकदा किंवा दोनदा तेलाचा मसाज करणं हा पर्याय आहे. यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं, त्याचप्रमाणे डोकेही शांत राहतं. पण केवळ तेल पुरेसं नाही. काही उपायानं हे तेल अधिक उपयुक्त बनवता येऊ शकतं.



▮तिळाच्या तेलात मेथीदाणे भिजत घाला. आता हे तेल मंद आचेवर गरम होऊ द्या. तेल गार झाल्यावर गाळून मेथीदाणे बाजूला करा. आता हे तेल अधिक औषधी आणि परिणामकारक आहे.

▮केसांसाठी आवळ्याची उपयुक्तता आपण जाणतो. आवळे उकळवा. आता हे मऊसर आवळे कूकरमध्ये ठेवून चार-पाच शिट्या करा. आवळ्याचा गर निघेल. हा गर गाळून घ्या. आता या मिश्रणात हवं ते तेल एकत्र करा आणि अर्धा तास गरम करा. थंड झाल्यावर तेल बाटलीत भरून ठेवा. या तेलानं केलेला मसाज अधिक चांगला परिणाम देईल.

▮सुकलेला आवळा तेलात मिसळा. तेल उकळू द्या. थंड झाल्यावर आवळ्यासहित तेल बाटलीत भरा.

▮खोबरेल तेलात बदाम मिसळा आणि तेलाला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यानंतर तेलाचा रंग बदलेल. रंग बदलल्यावर तेल आचेवरून उतरवा आणि थंड झाल्यावर बाटलीत भरून ठेवा.



▮खोबरेल तेलात मेथीदाणे घालून चार-पाच दिवस तसेच ठेवा. त्यानंतर गाळून तेल बाटलीत घाला. हे तेल अधिक उपयुक्त झालेलं असेल.

## पंचकर्म म्हणजे काय?


**पंचकर्म ही आयुर्वेदाची एक वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा आहे. प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली ही उपचार पद्धती आहे. यामध्ये रोग बरा करण्यासाठी एखादे औषध देऊन शरीरातच तो रोग जिरवून न टाकता तो रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे रोग समूळ नष्ट होतो. अर्थात तो रोग पुन्हा डोके वर काढत नाही व रोग समूळ नष्ट होतो. अशा रीतीने रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याच्या प्रक्रियेला शोधन क्रिया म्हटले जाते. मात्र त्याचबरोबरच बृहन, लंघन, स्नेहन, रुक्षण, स्वेदन व स्तंभन हे सहा उपक्रमही केले जातात. परंतु पंचकर्म उपचारात वमन, विरेचन, बस्ती, नस्य व रक्तमोक्षण हे प्रमुख व अत्यंत महत्वाचे असे उपचार आहेत.**



प्रत्येक रुग्णाला हे पाचही उपचार केलेच पाहिजेत, असे आवश्यक नाही. रुग्णाची प्रकृती, आतापर्यंत झालेली मोठमोठी आजारपणे, वय, कुठला ऋतू सुरू आहे या सर्वांचा विचार करून वैद्य रुग्णाला नेमका कुठला उपचार द्यायचा हे ठरवतात. पंचकर्मामध्ये वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे शोधन करायचे असते.

वात, पित्त व कफ हे तीन दोष संतुलित असतील तर कोणताही रोग होत नाही. मात्र यांच्यापैकी एखादाही दोष वाढला असेल, तर शरीरात रोग निर्माण होत असतो. हे तीन दोष वाढण्याच्यादेखील वेगवेगळ्या श्रेणी असतात. त्यानुसार उपचार निश्चित केला जातो. साधारणतः अन्न पचन न होणे, तोंडाला चव नसणे, स्थूलपणा, ॲनिमिया, जडत्व, अंग गळून जाणे, अंगावर पित्त उठणे, सर्वांगास कंप सुटणे, सर्व अंग जखडणे, कामात लक्ष न लागणे, अतिशय आळस येणे, थोडे श्रम करताच दम लागणे, अकारण अशक्तपणा येणे, सर्वांगास दुर्गंधी येणे, वारंवार कफ होणे, वारंवार पित्त होणे, निद्रानाश किंवा अतिशय झोप येणे, नपुंसकता येणे, वाईट स्वप्ने पडणे, शरीराचा वर्ण काळवंडणे ही लक्षणे दिसली तर पंचकर्म उपचार देणे अतिशय लाभकारक असते.

पंचकर्म उपचार करताना रोग्याची शक्ती पाहिली जाते. हे उपचार सोसण्याची ताकद रुग्णामध्ये असली पाहिजे. वात, कफ व पित्त हे तीन दोष शरीरात



वाढले असतील. सर्व शरीरात पसरले असतील व ते साम अवस्थेत असतील तर ते दोष वाढलेले असूनदेखील पंचकर्माद्वारे तसेच्या तसे बाहेर काढता येत नाहीत. साम अवस्थेतील रोग्याचे शोधन केल्यास रोग्याला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पाचन, स्नेहन व स्वेदन हे तीन पूर्व उपचार केले जातात व तद्नंतर पंचकर्म उपचार केले जातात.

वैद्यांनी सांगितलेले पथ्य व इतर सूचनांचे पालन करणे शक्य नसेल, तर पंचकर्म करू नये आणि स्वतःच्या मनाने तर अजिबात करू नये. पंचकर्म उपचारांचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून काही सूचना लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अतिशय मोठ्या आवाजात बोलू नये. कुठल्याही वाहनाने प्रवास करू नये. जास्त चालू-फिरू नये. एकाच जागी जास्त बसून वा पडून राहू नये, अति खाणे किंवा अजीर्ण टाळावे. वैद्यांनी सांगितलेलाच आहार घ्यावा आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे.

पंचकर्माने रोग शरीरातून समूळ नष्ट होतो. परंतु काही इतरही याचे फायदे आहेत. शरीरात अग्नी प्रदिप्त होतो. शरीराला व मनाला स्वस्थता मिळते. इंद्रिये प्रसन्न होतात. मन व बुद्धी आपापल्या कार्यांमध्ये उत्कर्ष करतात. शरीराचा वर्ण व कांती उजळते. त्वचा तजेलदार दिसू लागते. कार्यशक्ती म्हणजे स्टॅमिना वाढतो. शरीर पुष्ट व भारदार होते. वृद्धावस्था लवकर येत नाही. संतती नसलेल्यांना संततीप्राप्ती होते. निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य मिळते. पंचकर्म उपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावा, त्याने दुष्परिणाम होत नाहीत. हे सर्व फायदे मिळवायचे असतील तर पंचकर्म उपचार वर्षातून किमान एकदा तरी करून घेतलाच पाहिजे.

## पावसाळ्यात पाणी पिताना अशी घ्या काळजी...

**दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्‌भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते, तिथे तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...**

**पाणी गाळून घेणे**

वॉटर प्युरिफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणीने पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चांगल्या सोसायटीमध्ये राहतो, त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते, असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.

**उकळणे**

पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीवजंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरून जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)



**तुरटी फिरवणे**

तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

**नळाला फिल्टर बसवणे**

पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारे वेगवेगळे फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरू शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

## व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:** सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

## नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.

## जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮ बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

## लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा इटक (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. ‘बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.’ ‘वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,’ असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

## ‘फार्मा सही दाम’ ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच ‘फार्मा सही दाम’ नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**‘फार्मा सही दाम’ हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त**

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून ‘ऑगमेंटिन’ हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com